Impact Factor 2.147

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Publish Journal

VOL-III ISSUE-X Oct. 2016

Address
• Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
• Tq. Latur, Dis. Latur 413512
• (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
• aiirjpramod@gmail.com

Website
• www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

**Aayushi International Interdisciplinary Research Journal** (Refereed & Indexed Journal)
Vol - III Issue-X OCTOBER 2016 ISSN 2349-638x Impact Factor 2.147

# महाराष्ट्राच्या राजकारणात युती / आघाड्यांचा उदय आणि विकास

**प्रा.कमलाकर एन.राक्षसे**
राज्यशास्त्र विभाग,
विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, कळे.

**प्रस्तावना**

26 जानेवारी 1950 रोजी भारतीय राज्यघटनेची अंमलबजावणी देशात सुरू झाली. भारत हा राज्याचा संघ आहे, असे भारतीय घटनेच्या सुरुवातीला नमूद करण्यात आले आहे. देशात अनेक घटकराज्ये निर्माण करण्यात आली. घटकराज्यात प्रादेशिक सरकारे निर्माण झाली. देशाच्या अनेक प्रदेशात संयुक्त सरकारे निर्माण होवू लागली. केंद्रातही काँग्रेस प्रभावी काळ वगळला तर अनेक संमिश्र सरकारे उदयाला आलेली आहेत. युरोपीयन देशात सुद्धा संयुक्त सरकारे निर्माण झालेली पहावयास मिळतात. यामध्ये फ्रान्स, इटली, कॅनडा या देशाची नावे प्रामुख्याने घ्यावी लागतील.

एकंदरीत देशात संयुक्त सरकारचा दीर्घ अनुभव नसला तरी देशाच्या अनेक घटकराज्यात सुद्धा युतो/आघाड्यांचे सरकारे उदयाला आलेली आहेत. या राजकीय अनुभवाला महाराष्ट्र सुद्धा अपवाद नाही. महाराष्ट्रात सुद्धा युती/आघाडीचे राजकारण सुरुवातीपासूनच पहावयास मिळते. भलेही काँग्रेस महाराष्ट्राच्या राजकारणात दीर्घकाळ सत्तेवर राहिली तरीही.

**संशोधनाची उद्दिष्टे**

प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे ठेवण्यात येवून प्रस्तुत संशोधन पेपर लिहिण्यात आलेला आहे.

१) महाराष्ट्राचे राजकारण समजून घेणे.
२) महाराष्ट्रातील युती/आघाडीच्या राजकारणाचा आढावा घेणे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत संशोधनासाठी दुय्यम साधनांचा वापर करण्यात आलेला असून सदर संशोधनासाठी संदर्भग्रंथांचा वापर करण्यात येवून निष्कष काढण्याचा प्रयत्न केलेला आहे.

भारतात सुरुवातीच्या काळापासून अनेक राजकीय पक्ष स्थापन झाले होते. खऱ्या अर्थाने देशात 1967 नंतरच आघाडी/युतीचे राजकारण सुरुवात झाले असले तरी 1967 पूर्वी सुद्धा संयुक्त सरकारे देशात अनेक राज्यात अस्तित्वात होती. परंतु ही संयुक्त सरकारे फारच अल्पायुषी ठरली होती.

परंतु 1960 साली देशातील केरळ राज्यात काँग्रेस, मुस्लिम–लीग आणि प्रजा समाजवादी पक्ष या पक्षाच्या युतीने आधीचे साम्यवाद सरकार मोडून आपले सयुक्त सरकार स्थापन केले. परंतु 1967 नंतर काँग्रेस पक्षाला उतरती कळा लागून अनेक घटकराज्यात विरोधी पक्षाची युती सरकारे स्थापन झालेली पहावयास मिळतात. भारतात स्वांतत्र्योत्तर काळातील 1967 पर्यंतच्या कालखंड काँग्रेसच्या राष्ट्रीय पातळीवरील एक पक्ष वर्चस्वाचा कालखंड होता. त्याचे कारण स्वातंत्र्यपूर्वकाळातील काँग्रेसच्या स्वातंत्र्य आंदोलनातील नेतृत्वामुळे स्वातंत्र्यानंतर राजकीय पक्ष म्हणून काँग्रेसलाच संघटनेवर आधारित पक्ष म्हणून पुढाकार घेण्याची संधी मिळाली. एकंदरीत काँग्रेसच्या स्वातंत्र्य आंदोलनातील भूमिकेमुळे जनतेत प्रचंड पाठिंबा व नेहरूंच्या दिव्यवलयी व व्यापक भूमिकेमुळे देशात व अनेक घटकराज्यात स्पष्ट बहुमत मिळत गेले. परंतु पंडीत नेहरूंच्या कालखंडानंतर विशेषतः इंदिरा गांधींच्या कालखंडात काँग्रेसमध्ये गटबाजी उफाळून आली. 1967 नंतर हळूहळू विरोधी पक्षाच्या उदयाला प्रादेशिक पातळीवर प्रारंभ होत राहिला.

याच कालखंडात राम मनोहर लोहिया यांनी देशात गैर–काँग्रेसवाद मांडला. या अनुषंगाने देशात अर्थातच अनेक राज्यात गैर–काँग्रेसवाद उदयाला आला. अल्पावधीतच याचा विकास पहावयास मिळाला. म्हणूनच 1967 नंतर देशातील अनेक घटक राज्यात काँग्रेसत्तर सरकारे येवू लागली. याच राजकीय प्रक्रियेचा भाग म्हणून लहान–सहान राजकीय पक्ष उदयाला येवू लागले. भारतात त्याचप्रमाणे महाराष्ट्रात सुद्धा विरोधी पक्षाची दुर्बलता बराच काळ राहिली असली तरी 1967 नंतर राजकारण वेगळे वळण घेवू पहात होते.

युती/आघाडी सरकारे व राजकारण याची निश्चित परिभाषा करता येत नसली तरी साधारणपणे आपल्याला असे म्हणता येईल की, युती ही निवडणूकपूर्व होते तर आघाडी ही निवडणूकपूर्व व निवडणुकीनंतर सुद्धा होते. सरकारमधील काही आघाड्या निवडणूक होण्यापुर्वीच अस्तित्वात होत्या. उदा. केरळमधील 1967 च्या सार्वजनिक निवडणुकीच्यावेळी व 1970 च्या मध्यावधी निवडणुकांमध्ये स्पर्धेत उतरलेल्या विरोधी पक्षांच्या निवडणूकपूर्व आघाड्या 1967 च्या निवडणुकांचे निकाल लागल्यानंतर निर्माण झालेल्या आघाड्या बिहार, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश इ. राज्यात निवडणुकांचे निकाल लागल्यानंतर आघाड्या निर्माण झालेल्या आहेत.

वरीलप्रमाणे देशातील तत्कालीन कालखंडातील आघाडी आणि युतीच्या राजकारणाचा ऊहापोह केल्यानंतर आपण आता महाराष्ट्राच्या राजकारणाकडे वळूया.

महाराष्ट्र राज्याची स्थापना 1 मे 1960 रोजी झाली. महाराष्ट्राच्या राजकारणाकडे पाहिल्यानंतर महाराष्ट्रालासुद्धा आघाडी/युतीची परंपरा राहिली आहे. 1995 मध्ये महाराष्ट्राच्या राजकारणात फार मोठा बदल झालेला दिसून येतो. त्याचे कारण असे की, 1995 चे महाराष्ट्रातील शिवसेना–भाजपाचे युती सरकार हे पहिले शुद्ध बिगर काँग्रेसी युती/आघाडी सरकार होते. तत्पुर्वी म्हणजेच 1960 च्या अगोदरच्या कालखंडात 8 फेब्रुवारी 1956 रोजी डाव्या पक्षांच्या पुढाकाराने संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना करण्यात आली होती. साम्यवादी, प्रजा समाजवादी, समाजवादी आणि शेतकरी कामगार पक्षा व्यतिरिक्त लाल–निशाण, शेड्युल्ड कास्टस फेडरेशन, हिंदू महासभा आणि भारतीय जनसंघ आणि जनकाँग्रेस हे संयुक्त महाराष्ट्र समितीचे प्रमुख घटक पक्ष होते. जवळजवळ 11 बिगरकाँग्रेस पक्ष व गट आणि अपक्षांची संयुक्त आघाडी असे संयुक्त महाराष्ट्र समितीचे घटक होते. याचा उल्लेख अथवा संदर्भ देणे संशोधकाला गरजेचे वाटते की, संयुक्त महाराष्ट्र समिती ही शुद्ध राजकारणाच्या अनुषंगाने ही राजकोय पक्ष नव्हती. परंतु 11 घटक पक्ष एकत्रित आली होती. ही आघाडी महाराष्ट्राच्या राजकीय जीवनातील पहिली आघाडी म्हणून संबोधली पाहिजे. कारण महाराष्ट्राच्या राजकारणाचा एकूणच अभ्यास केल्यानंतर ही आघाडी महाराष्ट्राच्या राजकारणातील पहिली आघाडीच म्हणावी लागेल.

ही आघाडी 1957 च्या निवडणुकीत उतरलेली होती. या आघाडीला (संयुक्त महाराष्ट्र समितीला) लोकसभेच्या 23 जागा आणि विधानसभेच्या 129 जागा मिळाल्या होत्या. हा यशस्वी प्रयोग झाला. परंतु यशवंतराव चव्हाण यांच्यासारखा समर्थ नेता काँग्रेस पक्षाला लाभल्याने काँग्रेस महाराष्ट्रात लोकप्रिय झाली आणि काँग्रेसत्तर पक्षातील अनेक नेत काँग्रेसमध्ये प्रवेश केलेनंतर तसेच तत्कालीन महाराष्ट्र शासनाने सर्वजन हिताय–सर्वजन सुखाय धोरण स्विकारल्यानंतर याचा परिपाक म्हणून काँग्रेस पक्ष महाराष्ट्रात लोकप्रिय झाला. प्रदीर्घकाळ महाराष्ट्राच्या राजकारणात काँग्रेस पक्षच सत्तेवर राहिला. आजवरच्या काँग्रेस सत्तेला एकपक्षीय प्रभावशाली राजवट काँग्रेसी व्यवस्था (Congress System) प्रभावशाली (Hegemonic) सत्ता अशी अनेक नावे दिलेली आहेत. महाराष्ट्राच्या राजकारणात विरोधी पक्षांना बराच काळपर्यंत 1990 च्या दशकापर्यंत असलेले नगन्य स्थान होय. महाराष्ट्र राज्याची सत्ता हस्तगत करण्याची उर्मीच या पक्षांमध्ये शिल्लक नव्हती. परंतु मॅक्स वेबर यांच्या म्हणण्याप्रमाणे राजकीय पक्ष हे सत्तेच्या गढीवर मुक्कामाला असतात. राजकीय पक्ष आणि सत्ता यांचे अतुट नाते असते. अगदी लहान–सहान राजकीय पक्ष सत्तेची स्वप्ने पहातात. त्यांचा जन्मच मुळातच सत्ता हस्तगत करण्यासाठी झालेला असतो.

अन्य राज्याच्या तुलनेत महाराष्ट्र राज्यात काँग्रेसकडे सत्तेची मक्तेदारी बराच काळ होती. 1978–80 मधील पुरोगामी लोकशाही दलाची 20 महिन्यांची कारकीर्द देखील काँग्रेस (इ) व काँग्रेस (एस) यांच्या तत्त्वशुन्य व सत्तेसाठी एकत्र आलेल्या युतीतून शरद पवार यांच्या बाहेर पडण्यामुळे शक्य झाली. 1980 मध्ये इंदिरा गांधी पुन्हा पंतप्रधान झाल्यावर शरद पवार यांचे मंत्रीमंडळ बरखास्त करून राष्ट्रपती राजवट सुरू केली. राष्ट्रपती

राजवटीचा महाराष्ट्राचा पहिला अनुभव काँग्रेस पक्षाच्या सत्तेच्या मक्तेदारीचा प्रभाव महाराष्ट्राच्या राजकारणावर अनेक प्रकारे पडलेला पहावयास मिळतो.

1969 मध्ये काँगस पक्षात मोठी फूट पडली होती. तरी महाराष्ट्राच्या राजकारणावरील पक्षाची पकड मात्र ढिली झाली नव्हती. 1978 मध्ये काँग्रेसमध्ये पुन्हा फूट पडली ही फुट इंदिरा विरोधक आणि इंदिरा समर्थक अशी होती. तर नव्यानेच निर्माण झालेल्या जनता पक्षाला 99 जागा प्राप्त झाल्या होतया. 1978 मध्ये शरद पवारांनी काँग्रेस पक्षापासून दोन हात दूर राहूनच आपले स्वतंत्र अस्तित्व ठेवले होते. 1980 दशकानंतर काँग्रेस (एस) आणि इंदिरा काँग्रेस हे दोनच पक्ष महाराष्ट्राच्या राजकारणात प्रबळ होते.

महाराष्ट्राच्या राजकारणात 1978 मध्ये काँग्रेस (एस) आणि काँग्रेस (आय) यांच आघाडी सरकार अल्पजीवी ठरले. शरद पवारांनी चलाखीने काँग्रेस (एस) स्थापन केल्यावर हे सरकार कोसळले. यानंतर काँग्रेस (एस) + शेतकरी कामगार पक्ष आणि जनता पक्ष यांचे पुरोगामी लोकशाही दलाचे सरकार सत्तेवर आले.

वरील दोन्ही राजकीय प्रयोग वगळले तर महाराष्ट्राच्या राजकारणात काँग्रेस पक्षच सत्तेवर राहिला आहे.

देशातील प्रमुख राजकीय पक्षांनी युती/आघाडी सरकारची अपरिहार्यता मान्य केलेली आहे. भाजपनेसुद्धा आपला अजेंडा बाजूला ठेवून विविध घटकराज्यात प्रादेशिक पक्षांची युती/आघाडी करून आपले सरकार बनविले आहेत.

महाराष्ट्रात 1995 ला शिवसनेबरोबर युती करून सरकार स्थापन केले. भाजपने देशातील अनेक घटकराज्यात भावनिक आधारावर इतर राजकीय पक्षाबरोबर युती केल्याचे दिसून येते. याचाच एक भाग म्हणून महाराष्ट्र शिवसेनेसोबमत युती केली.

भाजप–शिवसेनेची अधिकृत युती 1989 मध्ये झाली. 1989, 1990, 1991, 1995 या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत शिवसेना–भाजप युतीने एकत्रित जागा लढविलया. 1995 च्या विधानसभा निवडणुकीत शिवसेना–भाजप युतीला 138 जागा प्राप्त झाल्या. अपक्षांच्या सहकार्याने महाराष्ट्रात पहिल्यांदाच पहिले (पुलोदचा–अपवाद वगळला तर) शिवसेना–भाजप युती सरकार हे पहिले बिगरकाँग्रेसी सरकार होते.

अशा प्रकारे महाराष्ट्राच्या राजकारणात युती/आघाडीचे शासन राहिलेले आहेत.

उपरोक्त अभ्यासाअंती काही निष्कष निघालेले आहेत.

१) महाराष्ट्राच्या स्थापनेपासूनच महाराष्ट्राच्या राजकारणात आघाड्यांची पार्श्वभूमी आहे.
२) महाराष्ट्राच्या राजकारणात एकपक्षीय राजवट संपुष्टात आलेली दिसून येते.
३) आघाडी/युती सरकारे कायम अनिश्चिततेच्या छायेखाली असतात. परिणामी लहान–सहान वंचित घटकानांही राजकारणात महत्त्व प्राप्त होते.
४) महाराष्ट्राच्या राजकारणात आघाडी शासनाला शिवसेना–भाजप युती राजकीय पर्याय देवू शकेल.
५) महाराष्ट्राच्या राजकीय विकासासाठी युती/आघाडी सरकारे उपयुक्त ठरतात.

संदर्भ सूची

१) भोळे भा.ल., *भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारकण,* पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर.
२) व्होरा राजेंद्र, पळशीकर सुहास, *महाराष्ट्रातील सत्तांतर,* ग्रंथाली प्रकाशन, मुंबई.
३) पळशीकर सुहास, कुलकर्णी सुहास, *सत्तासंघर्ष,* समकालीन प्रकाशन, पुणे.
४) जैन अशोक, *महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण,* शेठ पब्लिशर्स, मुंबई.
५) सिरसीकर व.म., *आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण,* कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.